# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक २५ / २०२६

## जास्तीचे वीज देयक दुरूस्त करून देण्याबाबत

गणपत सोपान ताकवले ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, (महावितरण) सासवड ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... ..... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- ऋषीकेश ताकवले

प्रतिवादी १ तर्फे :- १) भालचंद्र गवई, कार्यकारी अभियंता, सासवड विभाग
२) अनंत पवार, उपकार्यकारी अभियंता, निरा उपविभाग

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २५ मे २०२६

आदेश पारित दिनांक :- ६ जुलै २०२६

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक ३० डिसेंबर २०२५ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २ मार्च २०२६ रोजी दाखल केले. अपिलार्थीने विनियम १९.२२(एच) नुसार रु.२५०००/- दिनांक १७ मार्च २०२६ रोजी अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

नोंदणी करण्यात आली. मंचाने दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी ग्राहकाची तक्रार अंशतः मंजूर कली. सदर आदेशात पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

*२. शेती पंपाच्या वीज देयकामध्ये रु.१,७७,६६०/- एवढया रकमेचे सरासरी / अंदाजीत दिलेले देयक मीटर वरील वापरानुसार तसेच महावितरण कंपनीच्या नियमानुसार दुरुस्त करुन देण्यात यावे.*

२. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २५ मे २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी कै.गणपत सोपान ताकवले, राहणार हरगुडे, तालूका इंदापूर, जिल्हा बारामती, महावितरणचे दिनांक २४ जुलै १९९९ पासून शेती पंप वीज ग्राहक आहेत. वीज जोडणीचा तपशील खालीलप्रमाणे.

| Name | Consumer No. | Address | Sanct. Load | Date of Supply | Average bill with faulty status | Bill Revision |
|---|---|---|---|---|---|---|
| Ganpat Sopan Takawale | 187811849653 | Hargude, Tal. Purandar, Dist. - Pune, Pin-412301 | 5 HP | 24.07.1999 | 33,774 units (2598 units per quarter) for the period from Dec - 2022 to Mar - 2025 (39 months) | 105 units per quarter with a credit of Rs. 68,901.74 |

- अपिलार्थीने सप्टेंबर २०१४ पासून रु.२,०२०/- (दिनांक २०.०२.२०१५), रु.२,०००/- (दिनांक २२.०५.२०१५) इतक्याच रक्कमेचा भरणा केला. ग्राहकाची सप्टेंबर २०२० अखेर वीज देयक थकबाकी रु.१,०३,९५८/- इतकी होती.

- दिनांक २४.०३.२०२२ रोजी त्यावेळची एकुण थकबाकी रु.१,३३,९५२/- (डिसेंबर २०२१) पैकी अपिलार्थीने रु.४०,०००/- रक्कम भरणा कल्याचे सीपीएल (Consumer Personal Ledger) वरून दिसते. अपिलार्थींना सप्टेंबर २०२२ पर्यंत मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात आली. त्यावेळी अपिलार्थींची थकबाकी रु.१,१४,७३२.४२ इतकी होती. त्यानंतर जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीतील वीज देयक मीटर वाचनाप्रमाणे दुरुस्ती करून रु.७०६२.५९ (३५५५ युनीटस) चे डिसेंबर २०२२ मध्ये क्रेडीट देण्यात आले. त्यामुळे डिसेंबर २०२२ ची थकबाकी रु.१,१५,५८९.१८ इतकी आहे.

- त्यानंतर अपिलार्थीस डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ (३९ महिने) या कालावधीमध्ये मीटर नादुरूस्त असल्यामुळे सरासरी २५९८ युनीट त्रैमासीक याप्रमाणे एकुण ३३,७७४ युनीट (२५९८

x ३९/३) ची चुकीची वीज देयके देण्यात आली. अपिलार्थीचा मीटर (५०५०४२०२८) दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी नवीन मीटर (०८२२२८५३४) ने बदलण्यात आला.

- अपिलार्थीने १२ जानेवारी २०२५ रोजी मंचाकडे डिसेंबर २०२२ नंतरची वीज देयक दुरूस्त करण्याबाबत तक्रार दाखल केली. मंचाने शेती पंपाच्या वीज देयकामध्ये रू.१,७७,६६०/- एवढया रकमेचे सरासरी / अंदाजीत दिलेले देयक मीटर वरील वापरानुसार तसेच महावितरण कंपनीच्या नियमानुसार दुरूस्त करून देण्यात यावे असे आदेश दिले. प्रतिवादीने अपिलार्थीचा मीटर दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी (HPL मेकचा) नादुरूस्त मीटर बदलला (मीटर क्रं.०८२२२८५३४).

- सदर ग्राहकाच्या शेती पंपाची शाखा अधिकारी यांनी दिनांक ४ मार्च २०२६ रोजी स्थळ तपासणी केली व डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीचे वीज देयके ३५ युनीट प्रती महिना असा आहे असे तपासणी अहवालात नोंद केली ती खालीलप्रमाणे :

तक्ता १

| As per Verification Report of Pariche Section office dt. 04.03.2026 | |
|---|---|
| Meter Replaced Dt. | 10.12.2025 |
| Verification Dt. | 04.03.2026 |
| Total Day | 84 Days |
| Meter Reading | 184 KWH |
| Reading / Total Days = Per Day Consumption | 2 Units / Per Day |
| Per Month Consumption | 60 Units / Per Month |
| Three Month Consumption | 180 Units / Three Month |
| Bill Revision Done | 35 Units per Month instead of 60 Units per months |

- त्याप्रमाणे एकूण (३९ महिने) महिन्याचे वीज देयक दुरूस्त करून देण्यात आले. या वीज देयक दुरूस्तीमुळे अपिलार्थीस रू.६८,९०१.७४ इतक्या रक्कमेची वजावट मार्च २०२६ पर्यंतच्या वीज देयकात देण्यात आली ती खालीलप्रमाणे.

| Calcuation of Bill | | | | |
|---|---|---|---|---|
| Period | Particulars | Amount | Units | Remark |
| Net Arrears | Dec_2022 | 185314.06 | | |
| Dec_22 to Dec_25 (39 month) | Bill Revision Energy bill | -68901.74 | 33774-1350 = 32424 Units (39 month) | Bill Revision as per table no.-1 consumption |
| Dec_22 to Dec_25 (39 month) | Interest on arrears | 1970.27 | | (-) Adjustment |
| | Net bill Mar_2026 | 118382.59 | | |

- दिनांक २५ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२४/प्र.क्र.९/उर्जा-५ नुसार माहे एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४" सुरू करून ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या कृषी ग्राहकांना मागील थकबाकी वगळून लाभ देण्याची योजना सुरू करण्यात आली. **त्यामुळे या योजनेच्या एप्रिल २०२४ च्या पुर्वीच्या थकबाकीवर कोणताही परिणाम होणार नाही.** सदर थकबाकी माहे मार्च २०२६ अखेर

एकुण थकबाकी रु.१,१८,३८२.५९ अशी असून ती बरोबर आहे. सबब, सदर रक्कमेचा भरणा करणे अपिलार्थीस बंधनकारक आहे.

- महाराष्ट्र शासनाच्या "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४" नुसार ग्राहकास माहे जून २०२४ ते मार्च २०२६ या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची वीज आकारणी करून वीज देयक देण्यात आलेले नाही.

- प्रतिवादीने अशी विनंती केली की, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २५ मे २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी मयत गणपत सोपान ताकवले (मुत्यृ दिनांक २४ ऑगष्ट २०१५) हे राहणार हरगुडे, तालूका इदापूर, जिल्हा बारामती, महावितरणचे दिनांक २४ जुलै १९९९ पासून ५ एच पी चे शेती पंप वीज ग्राहक आहेत.

- अपिलार्थींनी नमुद केले की त्यांनी दिनांक १८ मार्च २०२२ रोजी सरासरी वीज देयकांबाबत ऑनलाईन तक्रार (क्र.००००२३४७०३००) दाखल केली. त्यानुसार जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीची वीज देयके दुरुस्ती करून दिली. त्यानंतर दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी सुध्दा मीटर दुरूस्ती करण्याकरीता तक्रार (क्र.००००२६३४४०४४) दाखल केली. त्याची महावितरणने कोणतीही दखल घेतली नाही. अपिलार्थीने दिनांक २४ मार्च २०२२ रोजी रु.४०,०००/- चा भरणा महावितरणकडे केला.

- अपिलार्थीस डिसेंबर २०२० ते डिसेंबर २०२५ या कालावधीत सरासरी २५९८ युनीट प्रती त्रैमासीक अशी चुकीची वीज देयके देण्यात आली. त्यावेळीही अपिलार्थीने वीज देयके दुरूस्त करून देण्याबाबत ऑनलाईन तक्रार दाखल केली होती, पण महावितरणने याबाबत कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे सदर वीज देयकांचा भरणा अपिलार्थीने केला नाही, त्यामुळे सदरच्या वीज देयकाची मार्च २०२५ अखेर थकबाकी, व्याज व दंड मिळून रु.१,८५,३१०/- एवढी एकुण थकबाकी झाली. त्यानंतरही दिनांक ४ जून २०२५ रोजी मीटर बाबत ऑनलाईन पध्दतीने तक्रार (००००३६४९३३५) दाखल केली, त्याचे निवारण न करता सदर तक्रारीवर रिझॉल्व्ह (Resolved) असा शेरा देण्यात आला.

- तसेच, सदर तक्रारीबाबत महावितरणकडे माहिती अधिकार २००५ अंतर्गत विचारणा केली असता अपिलार्थींच्या तक्रारी रद्द केल्या होत्या. तसेच दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी (HPL मेकचा)

अपिलार्थीस मीटर बदलून देण्यात आला (मीटर क्रं.०८२२८५३४). अपिलार्थीने दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच बारामती येथे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये ग्राहकाची तक्रार अंशतः मंजूर करताना शेती पंपाच्या वीज देयकामध्ये रू.१,७७,६६०/- एवढया रकमेचे सरासरी / अंदाजीत दिलेले देयक, मीटर वरील वापरानुसार, तसेच, महावितरण कंपनीच्या नियमानुसार दुरूस्त करून देण्यात यावे असे निर्देश दिले.

- अपिलार्थीने नवीन मीटर बसविल्यानंतर त्यावर येणाऱ्या मीटर वाचनाच्या सरासरी नुसार डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीचे एकूण (३९ महिने) महिन्याचे वीज देयक दुरूस्त करून देण्यात यावीत व थकीबाकीवरील व्याज व दंड याबाबत योग्य तो निर्णय द्यावा.

**विश्लेषण व निर्णय**

५. पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक २४ जुलै १९९९ पासून ५ एच पी चे शेती पंप वीज ग्राहक आहेत. अपिलार्थीची प्रमुख मागणी अशी आहे की, दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी अपिलार्थीचा नवीन मीटर (क्र.०८२२२८५३४) बसविल्यानंतर त्यावर येणाऱ्या मीटर वाचनाच्या सरासरी नुसार डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीचे एकूण (३९ महिने) महिन्याचे वीज देयक दुरूस्त करून देण्यात याव अशी आहे.

६. अपिलार्थीने सप्टेंबर २०१४ पासून नियमितपणे वीज देयकांचा भरणा न करता फक्त रू.२,०२०/- (दिनांक २०.०२.२०१५), रू.२,०००/- (दिनांक २२.०५.२०१५) इतक्याच रक्कमेचा भरणा केला. ग्राहकाची सप्टेंबर २०२० अखेर वीज देयक थकबाकी रू.१,०३,९५८/- इतकी होती. त्यानंतर दिनांक २४.०३.२०२२ रोजी त्यावेळची एकुण थकबाकी रू.१,३३,९५२/- (डिसेंबर २०२१) पैकी अपिलार्थीने रू.४०,०००/- रक्कम भरणा केल्याचे सीपीएल (Consumer Personal Ledger) वरून दिसते. अपिलार्थीना सप्टेंबर २०२२ पर्यंत मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात आली. त्यावेळी अपिलार्थीची थकबाकी रू.१,१४,७३२.४२ इतकी होती. डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ (३९ महिने) या कालावधीमध्ये सरासरी २५९८ युनीट त्रैमासीक याप्रमाणे एकुण ३३,७७४ युनीटचे चुकीचे वीज देयक देण्यात आले. तसेच अपिलार्थीचा मीटर दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी बदलण्यात आला. प्रतिवादीने केलेल्या दिनांक ४ मार्च २०२६ रोजीच्या स्थळ तपासणी अहवालानुसार वीज देयके ३५ युनीट प्रती महिना असे डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीचे एकूण (३९ महिने) महिन्याचे वीज देयक दुरूस्त करून अपिलार्थीस रू.६८,९०१.७४ इतक्या रक्कमेची वजावट मार्च २०२६ पर्यंतच्या वीज देयकात देण्यात आली. अपिलार्थीस "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४" या योजन अंर्तगत जून २०२४ पासून ग्राहकास कोणत्याही प्रकारची वीज

आकारणी न करता वीज देयके देण्यात आलेली आहत. ग्राहक वैयक्तिक खाते (CPL) मध्ये अपिलार्थीची माहे मार्च २०२६ अखेर दर्शविलेली एकुण थकबाकी रू.१,१८,३८२.५९ असून, ती योग्य आहे. अपिलार्थीस डिसेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीचे एकूण (३९ महिने) महिन्याचे वीज देयक दुरूस्त करून दिले आहे. अपिलार्थीने दिनांक २४ मार्च २०२२ पासून दिनांक ३ जुलै २०२६ पर्यंत (४ वर्षे ३ महिने ९ दिवस) या कालावधीत कोणतीही रक्कमेचा भरणा केल्याचे दिसत नाही. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात येत आह व निकाली काढण्यात येत आहे.

७. अपिलार्थीने अभिवेदन सादर करताना भरलेली अनामत रक्कम रू.२५,०००/- अपिलार्थीच्या वीज देयकात समायोजीत करण्यात यावी.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)